08-03-2024-Dai-06_Layout 1 03/07/2024 10:19 PM Page 1



## देशी तुपाचं प्रकरण पोहोचलं सुप्रीम कोर्टात, युक्तिवाद ऐकून न्यायमूर्तीही अवाक्



नवी दिल्ली : सुप्रीम कोर्टामध्ये नेहमीच मोठमोठ्या खटल्यांची सुनावणी होत असते. मात्र काही खटले असेही असतात, ज्याबाबत ऐकून न्यायमूर्तीच नाही तर सर्वसामान्यही आश्चर्यचकित होतात. असाच एक खटला बुधवारी सर्वोच्च न्यायालयासमोर सुनावणीसाठी आला.

त्यामध्ये तुपाबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. यात याचिकाकर्त्यांनी तूप हे पशुधन नसल्याचा दावा केवा होता. तूप हे गाय आणि म्हैशीपासून थेटपणे मिळत नसल्याचा दावा याकिकाकर्त्यांनी केला होता. दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाने स्पष्टपणे सांगितले की, ज्यांच्या दुधामुळे तूप बनते, त्या पशूंचं तूप हे उत्पादन मानलं जाईल. सर्वोच्च न्यायालयाने आंध्र प्रदेशच्या कायद्यानुसार तुपाला पशुधन उत्पादन जाहीर करत राज्य सरकारच्या १९९४ ची अधिसूचनेला कायम ठेवले आहे. त्यामध्ये बाजार समितींना तुपाच्या खरेदी विक्रीवर शुल्क आकारण्याचा अधिकार देण्यात आलेला आहे. तुपाच्या खरेदी विक्रीवर मार्केटिंग चार्ज लावण्याशी संबंधित प्रश्नावर सर्वोच्च न्यायालयाला तूप हे आंध्र प्रदेश बाजार अधिनियम १९६६ मधील तरतुदींनुसार पशुधन उत्पादन आहे हे निश्चित करायचे होते.

या याचिकेवर सुनावणी करताना न्यायमूर्ती सुधांशू धुलिया आणि जस्टिस एस.व्ही.एन. भट्टी यांच्या खंडपीठाने सांगितले की, तूप हे पशुधन नाही हा तर्क निराधार आहे. त्याउलट खरंतर तूप हे पशुधन उत्पादन आहे, हा तर्क तार्किकदृष्ट्या योग्य आहे. अधिनियमाच्या कलम २(व्ही) अंतर्गत पशुधनाला परिभाषित करण्यात आलं आहे. जिथे गाय आणि म्हैस निर्विवादपणे पशुधन आहे. तूप एक दूग्ध उत्पादन आहे, ते पशुधनापासून बनलेलं असतं.

## उन्हाळ्याआधीच 'जलसंकट'! २००० रुपयांत २० लीटर पाणी



बंगळुरू: कावेरी नदीचं पाणी कमी झाल्याने आणि वाढत्या दुष्काळी परिस्थितीमुळे कर्नाटकच्या बंगळुरूमधील काही भागात पिण्याच्या पाण्याचं संकट अधिक गडद झालं आहे. त्यामुळे तेथील लोकांना पाण्याचे टँकर आणि पाणीपुरवठा केंद्रांसमोर तासनतास लांब रांगेत उभे राहावे लागत आहे.

पाण्याची वाट पाहावी लागत आहे. बंगळुरूच्या व्हाईटफिल्ड, महादेवपुरा आणि आरआर नगरसारख्या भागात लोकांना पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणवत आहे.बंगळुरूमधील अनेक भागात बोअरवेल कोरड्या पडल्या आहेत. नागरिकांना पाण्यासाठी टँकरवर अवलंबून राहावे लागत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, एआर नगरच्या संपूर्ण पट्टानगरमध्ये लोकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. एकापेक्षा जास्त भांड्यात पाणी घेतल्यास अधिकारी परत पाठवतात, असा आरोप लोकांनी केला आहे.अधिकारी आपल्या मुलांनाही सोबत राहू देत नसल्याचा आरोप तेथील स्थानिकांनी केला आहे. ते मुलांना परत पाठवतात. जनावरांना आंघोळ घालण्यासाठी आणि पाणी पाजण्यासाठीही पाणी नसल्याचं लोक सांगतात. गेल्या तीन महिन्यांपासून पाणीटंचाई आहे. पाण्यासाठी अनेक तास रांगेत उभं राहावं लागत असल्याचं नागरिकांनी सांगितलं.आरओ प्लांटमधून पिण्याच्या पाण्यासाठी फक्त एकच कॅन घेण्याची परवानगी आहे. आम्हाला आता प्रत्येक कॅनसाठी २००० रुपयांपेक्षा जास्त पैसे द्यावे लागतील, ज्यासाठी पूर्वी ६०० ते १००० रुपये आकारले जात होते. त्यांनी खासगी टँकरला पाण्याचे दर कमी करण्यास सांगितल्यावर त्यांनी त्यांच्या भागात येणं बंद केलं, असा आरोप लोक करतात. सरकारला दररोज ई-मेल पाठवले जातात, पण आजपर्यंत त्याचा काही उपयोग झाला नाही.

## महिलांसाठी उपयुक्त ठरणार 'मेरी सहेली योजना'; या पद्धतीने पुरवली जाते सुरक्षा



नवी दिल्ली : अनेकदा महिला सुरक्षित नसल्याचे पाहायला मिळते. त्यातच आता महिलांसाठी सुरक्षित आणि प्रगतीशील वातावरण निर्माण करण्यासाठी सरकार प्रत्येक क्षेत्रात अनेक प्रयत्न करत आहे.

देशभरात महिलांच्या सुरक्षेसाठी मोदी सरकारकडून एक योजना राबविली जात आहे. त्या योजनेचे नाव मेरी सहेली योजना' असे असून त्याबाबतची अधिक माहिती आज आपण जाणून घेणार आहोत.मेरी सहेली योजना' ही ट्रेनमध्ये प्रवास करताना महिलांसाठी उपयुक्त ठरणार आहे. ट्रेनमध्ये प्रवास करताना कोणत्याही प्रकारची समस्या आल्यास मेरी सहेली योजना' या योजनेअंतर्गत महिला तक्रार करू शकतात. विशेषत: ट्रेनमध्ये एकट्या प्रवास करणाऱ्या महिलांना ही योजना फायद्याची ठरणार आहे. मेरी सहेली योजनेच्या टीममध्ये फक्त महिलांचा समावेश असेल. ट्रेनमध्ये एकट्याने प्रवास करणाऱ्या महिलेला विशेष सुरक्षा मिळेल. ट्रेनमध्ये प्रवास करणाऱ्या महिलांची काळजी फक्त महिलाच घेतील. ही टीम एकटीने प्रवास करणाऱ्या महिलेला ती कुठे जात आहे? कोणी तिचा छळ करत आहे का? ट्रेनमध्ये कोणत्याही प्रकारची समस्या येत आहे का? याबाबतची माहिती विचारु शकते. त्यामुळे आता रेल्वेने प्रवास करणाऱ्या महिलांना काळजी करण्याची गरज नाही. मेरी सहेली योजना ट्रेनमध्ये एकट्याने प्रवास करणाऱ्या महिलांची ओळख करून देईल आणि त्यांना विशेष संरक्षण देईल. याशिवाय त्या महिलांवरही नजर ठेवण्यात येणार आहे. महिला प्रवाशांना प्रत्येक स्थानकावर वेगवेगळी टीम मिळेल. या योजनेनुसार, कोणत्याही कारवाईसाठी रेल्वे स्थानकांवर आरपीएसएफ एस्कॉर्ट कर्मचारी आणि आरपीएफ उपस्थित राहतील.

## तृणमूल'चा विनाश अटळ! पंतप्रधानांचा दावा



पश्चिम बंगाल : पश्चिम बंगालमधील संदेशखालीत झालेल्या अत्याचारविरोधी असंतोषाचे वादळ अवघ्या पश्चिम बंगालमध्ये घोंघावणार आहे. येत्या लोकसभा निवडणुकीत पश्चिम बंगालमधील सत्ताधारी तृणमूल काँग्रेसचा पराभव करण्यात महिला शक्ती महत्त्वाची भूमिका बजावेल,' असा दावा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुधवारी केला आणि तृणमूल काँग्रेसवर जोरदार टीकास्त्र सोडले. पश्चिम बंगालमधील उत्तर २४ परगणा जिल्ह्याचे मुख्यालय असलेल्या बारासात येथे भाजपने आयोजित केलेल्या नारी शक्ती वंदन अभिनंदन' कार्यक्रमाला मोदी संबोधित करत होते. मोदी म्हणाले, की संदेशखालीतील महिला शक्तीवर अत्याचाराचे घोर पाप केले गेले आहे. त्यामुळे शरमेने सर्वांचीच मान झुकली आहे. तृणमूल काँग्रेसच्या नेतृत्वाखालील पश्चिम बंगालमधील सरकार उच्च न्यायालयापासून सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयांचे धक्के सहन करूनही आपल्या राज्यातील महिलांवर अत्याचार करणाऱ्या गुन्हेगारांना रक्षण देण्यासाठी आपली संपूर्ण शक्ती खर्च करत आहे. यामुळे पश्चिम बंगालसह अवघ्या देशातील महिला संतापल्या आहेत. महिला शक्तीच्या संतापाची ही लाट केवळ संदेशखलीपुरती मर्यादित राहणार नाही, तर ती संपूर्ण बंगालमध्ये पसरेल आणि संपूर्ण राज्यातून तृणमूल'ला उद्ध्वस्त करेल. तृणमूल काँग्रेस सरकार राज्यातील महिलांच्या सुरक्षेऐवजी लांगूलचालन-तुष्टीकरणाच्या राजकारणाला महत्त्व देत आहे.पश्चिम बंगालमधील बारासात येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सभेला उपस्थित राहण्यासाठी संदेशखाली येथून महिलांना घेऊन जाणाऱ्या काही बस पोलिसांनी रोखल्या.

## हमासच्या हल्ल्याच्यावेळी झाले होते लैंगिक अत्याचार ! संयुक्त राष्ट्रात पुराव्यांसह अहवाल



हमास: हमासच्या दहशतवाद्यांनी ७ ऑक्टोबरला दक्षिण इस्त्रायलमध्ये केलेल्या हल्ल्याच्यावेळी लैंगिक अत्याचारही केले होते, असे पुरावे संयुक्त राष्ट्राने केलेल्या तपासाच्यावेळी आढळून आले आहेत.

संयुक्त राष्ट्राच्या विशेष तपास पथकाने अलिकडेच इस्त्रायलमधील या भागाचा दौरा केला. त्यावेळी हे पुरावे मिळाले असल्याचे या पथकाच्या प्रमुख प्रमिला पट्टन यांनी सांगितले. हमासच्या दहशतवाद्यांनी इस्त्रायली महिलांवर बलात्कार आणि लैंगिक अत्याचार केले होते, असा निष्कर्ष असलेला अहवाल पट्टन यांच्या पथकाने संयुक्त राष्ट्रात सादर केला आहे. पीडीत महिलांनी पुढे येऊन याविषयीची तक्रार नोंदवावी, असे वारंवार आवाहन केल्यानंतरही इस्त्रायलमधील महिला या पथकासमोर आल्या नाहीत. पथकाला मिळालेले पुरावे परस्थितीजन्य असल्याचे पट्टन यांनी सांगितले. या तपास पथकाने काही साक्षीदार, हल्लूयात बचावलेल्या व्यक्ती, सुटका झालेले ओलीस नागरिक, आरोग्य सेवक आणि अन्य लोकांच्या मुलाखती घेऊन आपले निष्कर्ष काढले आहेत. हमासच्या हल्ल्यानंतर जवळपास ५ महिन्यांनी हा अहवाल तयार करण्यात आला आहे. हमासच्या या हल्ल्यात १,२०० जण ठार झाले होते आणि २५० जणांचे हमासने अपहरण केले होते. आगामी रमझानच्या पवित्र महिन्यात गाझामध्ये युद्धविराम लागू करण्याबाबत कैरोमध्ये चर्चा सुरू आहे. हा युद्धविराम घडवून आणण्यासाठी अमेरिकेच्या उपाध्यक्षा कमला हॅरिस यांनी देखील आग्रह धरला आहे. इस्त्रायलने केलेल्या वॉर कॅबिनेटचे सदस्य संयुक्त राष्ट्राचे पदाधिकारी आणि हॅरिस यांच्या संपर्कात आहेत. दुसरीकडे गाझामध्ये मदत उपलब्ध करून देणार् या संयुक्त राष्ट्राच्या एजन्सीमध्येच ४५० दहशतवादी आहेत, अशी टीका इस्त्रायलने सुरू केली आहे. दुसरीकडे गाझा पट्ट्यातील खान युनिस भागात इस्त्रायलने केलेल्या हल्लूयात १७ पॅलेस्टिनी ठार झाल्याचे पॅलेस्टिनी अधिकाऱ्यांनी म्हटले आहे.

## इम्रान ज्या तुरुंगात कैद, तिथे दहशतवादी हल्ल्याचा प्रयत्न




पाकिस्तान: पाकिस्तानच्या अडियाला तुरुंगात गुरुवारी रात्री दहशतवादी हल्ल्याचा प्रयत्न झाला. हे तेच तुरुंग आहे जिथे माजी पंतप्रधान आणि पीटीआय नेते इम्रान खान तुरुंगात आहेत. पाकिस्तानी मीडिया डॉन न्यूजनुसार, अफगाणिस्तानातून ३ दहशतवाद्यांनी हल्ला करण्याचा प्रयत्न केला.

मात्र, पोलीस आणि काउंटर टेररिझम डिपार्टमेंट (उढऊ) यांनी मिळून हा कट उधळून लावला. रावळपिंडी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सीटीडीने तिन्ही दहशतवाद्यांना अटक केली. दहशतवाद्यांकडून अनेक शस्त्रे, ग्रेनेड, आयईडी आणि तुरुंगाचा नकाशा जप्त करण्यात आला आहे.

पोलिस प्रमुख सय्यद खालिद हमदानी यांनी सांगितले की, पोलिस आणि इतर यंत्रणा संयुक्तपणे कारागृहाच्या आजूबाजूच्या परिसरात शोध मोहीम राबवत आहेत. इम्रान खान यांच्याशिवाय पाकिस्तानचे माजी परराष्ट्र मंत्री शाह महमूद कुरेशी हे देखील या तुरुंगात कैद आहेत.पाकिस्तानचे अडियाला जेल हुकूमशहा जनरल झिया-उल-हक यांनी १९८० च्या दशकाच्या सुरुवातीला बांधले होते. पाकिस्तानचे माजी पंतप्रधान झुल्फिकार अली भुट्टो यांनाही त्यांनी याच तुरुंगात डांबले होते. मात्र, त्यावेळी ते पूर्णपणे तयार नव्हते.

पाकिस्तानातील राजकीय कैद्यांना सामान्यतः अडियाला तुरुंगात ठेवले जाते. इम्रान यांच्या आधी माजी पंतप्रधान युसूफ रझा गिलानी, नवाझ शरीफ, त्यांची मुलगी मरियम नवाज यांच्यासह अनेक वरिष्ठ अधिकारी या तुरुंगात राहिले होते. यापूर्वी गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्येही इम्रान खान यांच्या वकिलाने त्यांच्या जीवाला धोका असल्याची भीती व्यक्त केली होती. वकील नईम पंजुथा यांनी सांगितले होते की, खान यांना स्लो पॉयझन देऊन मारले जाऊ शकते.


## उमेदवारीसाठी ट्रम्प आणि बायडेन आघाडीवर हेले यांच्यावरील दडपण वाढले



अमेरिका :अमेरिकेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत उमेदवारी मिळवण्यासाठी मंगळवारी १५ राज्यांमध्ये झालेल्या प्रायमरीच्या मतदानामध्ये अध्यक्ष ज्यो बायडेन यांनी डेमोक्रॅटिक पक्षाकडून आणि डोनाल्ड ट्रम्प यांनी रिपब्लिकन पक्षाकडून मोठी बाजी मारली आहे.

यामुळे नोव्हेंबर महिन्यात होणाऱ्या अध्यक्षीय निवडणुकीमध्ये पुन्हा एकदा बायडेन आणि ट्रम्प हे आमने सामने उभे ठाकण्याची शक्यता निर्माण झाली आहे. संयुक्त राष्ट्रातील अमेरिकेच्या माजी राजदूत आणि ट्रम्प यांच्या कट्टर प्रतिस्पर्धी निकी हेले यांच्यावर मात्र आता मोठे दडपण आले आहे. मंगळवारच्या प्रायमरीदरम्यान रिपब्लिकन उमेदवारीसाठी ट्रम्प यांनी हेले यांच्यावर मोठी आघाडी मिळवली आहे. ट्रम्प यांनी टेक्सास, कॅलिफोर्नियासह अन्य ११ राज्यांमधूल रिपब्लिकन सदस्यांचा पाठिंबा मिळवला आहे. तर निकी हेले यांना वेरमोंटमध्ये विजय मिळाला आहे.मात्र येथेही त्यांना केवळ एक टक्क्याची आघाडी मिळाली आहे. या १५ राज्यांमध्ये मिळूनही ट्रम्प यांच्याकडे रिपब्लिकन सदस्यांचे पुरेसे संख्याबळ जमा झाले नाही. मात्र ते बहुमताच्या खूप जवळ जाऊन पोचले आहेत. पक्षाची अंतिम उमेदवारी मिळवण्यासाठी इच्छुक उमेदवाराला प्रायमरीमध्ये निवडल्या गेलेल्या १,२१५ रिपब्लिकन सदस्यांचा पाठिंबा मिळणे आवश्यक असते. मंगळवारच्या १५ राज्यांमधील प्रायमरीनंतर ट्रम्प यांच्याकडे २४४ सदस्यांचा पाठिंबा आहे. तर निकी हेले यांच्याकडे अवघ्या ८६ सदस्य आहेत.दुसरीकडे डेमोक्रॅटिक पक्षाकडून पुन्हा उमोदवारी मिळवण्याच्या प्रयत्नात असलेले विद्यमान अध्यक्ष ज्यो बायडेन यांनी डेमोक्रॅटिक पक्षासाठीच्या बहुतेक सर्व राज्यांच्या प्रायमरीत विजय मिळवला आहे.

## नवाझ शरीफ यांचा पक्ष ठरला पाक संसदेतील सर्वात मोठा पक्ष



पाकिस्तान: नवाझ शरीफ यांचा पाकिस्तान मुस्लिम लीग-नवाझ गट हा पक्ष पाकिस्तानच्या संसदेमधील सर्वात मोठा राजकीय पक्ष ठरला आहे. संसदेतील राखीव जागा माजी पंतप्रधान इम्रान खान यांचा पाठिंबा असलेल्या सुन्नी इत्तेहादुल कौन्सिल या पक्षाला देण्यास सभापतींनी नकार दिला आणि या जागा पीएमएल-एन पक्षाला देण्यात आल्या. त्यामुळे पीएमएल-एन पक्षाची सदस्य संख्या वाढून १२३ इतकी झाली आहे. राखीव जागांमध्ये वाटा मिळावा, याचसाठी इम्रान खान यांच्या पाकिस्तान तेहरिक-ए-इन्साफ पक्षाच्या पाठिंब्यावर निवडून आलेले सर्व ९३ अपक्ष सदस्य सुन्नी इत्तेहादुल कौन्सिल पक्षामध्ये सामील झाले आहेत. मात्र पीटीआय पक्षाचा पाठिंबा असलेला एसआयसी संसदेतील महिला आणि अल्पसंख्यांकांसाठीच्या राखीव जागा मिळण्यासाठी पात्र नाही. त्यामुळे या राखीव जागा अन्य पक्षाला देण्यात याव्यात, असे निवडणूक आयोगाने सोमवारी जाहीर केले. संसदेत निवडून आलेल्या २६६ सदस्यांच्या प्रमाणात राखीव जागांचे वाटप करण्यात आले. संसदेतील एकूण ३३६ जागांमध्ये महिलांसाठी ६० आणि अल्पसंख्यांकांसाठी १० जागा राखीव आहेत. लोकप्रतिनिधींच्या प्रमाणात या जागा सत्तारुढ पक्षाला देण्यात आल्या. पीएमएल-एन पक्षाने निवडणुकीत ७५ जागा जिंकल्या होत्या. निवडून आलेले ९ अपक्ष देखील नंतर या पक्षामध्ये सामील झाले होते. राखीव जागांपैकी १९ जागा पीएमएल-एनला देण्यात आल्या होत्या. यामुळे पीएमएल-एन पक्षाची एकूण सदस्य संख्या १०७ इतकी झाली होती. एसएयसीला जागा देण्यास नकार देण्यात आल्यानंतर महिलांसाठीच्या १५ आणि अल्पसंख्यांकांसाठीची एक जागा देखील पीएमएल-एनला मिळाली. यामुळे पीएमएल-एनची एकूण सदस्य संख्या १२३ झाली. यामुळे हा पक्ष पाकिस्तानच्या संसदेतील सर्वात मोठा पक्ष बनला आहे.

## हेराल्ड टीव्ही बुलेटिन




साकोर्डा येथील चार ग्रामस्थांनी स्वखर्चाने टँकर भाड्याने घेऊन ग्रामस्थांना पाणीपुरवठा सुरू केला आहे. गेल्या पंधरवड्यापासून रगाडा नदीतील प्रदूषण आणि पीडब्ल्यूडीच्या पिण्याच्या पाण्याचा पुरवठा न केल्यामुळे साकोर्डा ग्रामस्थांना सध्या पाणी संकटाचा सामना करावा लागत आहे. दोन आठवड्यांहून अधिक काळ ग्रामस्थांना शुद्ध पाणीपुरवठा होत नसल्याच्या निषेधार्थ ग्रामस्थांनी साकोर्डा पंचायत आणि पीडब्ल्यूडी कार्यालय धारबांदोरा येथे घागर मोर्चा काढण्याचा इशारा दिला आहे.



पर्यटन मंत्रालयाच्या प्रसाद योजनेंतर्गत जुन्या गोव्यातील बॅसिलिका ऑफ बॉम जीझस येथे सुविधांच्या विकासासाठी कामांचा प्रारंभ गुरुवारी करण्यात आला. १७ कोटी रुपयांची कामे प्रदर्शनादरम्यान बॅसिलिकाला भेट देणाऱ्या लोकांसाठी सुविधा निर्माण करणार आहेत आणि सेंट फ्रान्सिस झेवियर प्रदर्शनापूर्वी ही विकासकामे पूर्ण होण्याची शक्यता आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या कामांचा ऑनलाईन प्रारंभ करण्यात आला.



विवाह नोंदणीसाठी बनावट रहिवासी दाखले सादर केले जात असल्याचे निदर्शनास आल्यानंतर दक्षिण जिल्हा निबंधकांनी पोलिसांत तक्रार दाखल केली आहे. या बनावटगिरीत एजंटांचे मोठे रॅकेट असण्याची शक्यता असल्याची माहिती कुलसचिव सूरज वेर्णेकर यांनी दिली. त्रयस्थ व्यक्तीकडून संबंधित पक्षाकडून तब्बल ४० हजार रुपये उकळून प्रमाणपत्रे देण्यात आल्याचे अंतर्गत चौकशीत समोर आले आहे. याप्रकरणी फातोर्डा पोलिसांत पोलिस तक्रार दाखल करण्यात आली आहे.



पंचायतमंत्री माविन गुदिन्हों यांनी नौदलावर निशाणा साधला आहे. त्यांनी आरोप केला की मंजूर झालेल्या ५५० कोटी रुपयांच्या नवीन उड्डाणपूल प्रकल्पासाठी नौदल राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाला सहकार्य करण्यास तयार नाही. नौदलाने त्यांच्या परिसरात उंच इमारती बांधताना स्थानिक अधिकाऱ्यांकडून घेतलेल्या परवानग्या आधी आम्हाला दाखवाव्यात आणि मगच या परिसरातल्या घरांची ऊंची कमी करण्यास सांगावे, अशी मागणीही गुदिन्हों यांनी केली आहे.



गोवन्स फॉर दाबोलिम ओन्ली (जीएफडीओ) ने आरोप केला आहे की सरकार दाबोळी विमानतळ हळूहळू बंद करणार आहे. सरकारचे जीएमआरच्या मोप विमानतळाला पूर्ण समर्थन असल्यामुळे हा विमानतळ बंद करण्याचा घाट सरकारने घातला आहे, असा आरोप या संस्थेच्या सदस्यांनी केला आहे. सध्या दाबोळी विमानतळावर प्रवाशी येण्याजण्याच्या संख्येत २० टक्क्यांनी घट झाल्याचे खुद्द विमानतळ प्राधिकरण संचालकांनीच मान्य केले आहे.




वेळसाव येथील इन्फंट जिझस अॅक्डमी स्कूलमध्ये गुरुवारी चोरी झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. शाळेच्या कार्यालयात ठेवलेली रोख रक्कम, सीसीटीव्ही कॅमेरा डीव्हीआरसह शाळेची दानपेटी लुटण्यात आली. मुरगाव तालुक्यात महिनाभरात चोरीची ही दुसरी घटना आहे. या शाळांसोबतच वेळसावमधील इतरही अनेक शाळांमध्ये अशाच पद्धतीनं दरोडा पडला आहे. शाळेच्या मुख्याध्यापकांनी पोलिसांना लवकरात लवकर दोषींना पकडण्याचे आवाहन केले आहे.



फोंडा शहर विकास आराखड्याला नगरपरिषदेच्या बैठकीत एकमताने मंजूरी मिळाली आहे. गुरुवारी झालेल्या या बैठकीत शहराच्या विकासासाठी असलेल्या सिटी मास्टर प्लानमध्ये कोणत्या महत्वाच्या गोष्टी नमूद करण्यात आल्या आहेत. याबाबत चर्चा करण्यात आली. शहर परिसरातील नादुरुस्त वाहनांवरही फोंडा नगरपालिका कारवाई सुरू करणार असल्याचे नगराध्यक्ष रितेश नाईक यांनी स्पष्ट केले आहे.



१७ व्या रेबेलो पंडाल ऑल गोवा ओपन फुटबॉल स्पर्धेत एबीसी कुडतारी आणि स्टार बॉईज सेंट जोस डी एरियल यांच्यात मायना कुडतारी येथील सेंट रीटा चर्च मैदानावर रोमहर्षक सामना पाहायला मिळाल्याने फुटबॉल रसिक मोठ्या अपेक्षेने जमले. हाई-स्टेक चकमक बुधवारी झाली, अत्यंत उत्साहाच्या वातावरणात खेळल्या जाणाऱ्या या स्पर्धेत चुरशीचे सामने पाहायला मिळत आहेत.

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी
oHeraldo TV
The Voice of Goa since 1900
गोव्यातल्या ताज्या आणि वेगवान बातम्यांसाठी पाहा...